# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर


सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/५७/२०१०/ दिनांक :

प्रति,

श्री. बाळा तुकाराम बिसूरकर,
मु.पो. विटा, ता. खानापूर, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, विटा, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय क्र. २, विटा, जि. सांगली

— विरूध्द पक्षकार

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी.सी. लेले, सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. बाळा तुकाराम बिसूरकर, मु.पो. विटा हे पॉवरलूम वापराचे ग्राहक आहेत. सदर पॉवरलूम ग्राहकासाठी महाराष्ट्र शासनाने तत्कालीन परिस्थितीनुरुप सदर उद्यागाच्या मदतीसाठी यंत्रमाग संजीवनी योजना मंजूर केली. सदर योजनेचा लाभ मिळाला नसल्याने संबधित ग्राहकाने मंचात तक्रार दाखल केली आहे. मंचात येण्यापूर्वी अंतर्गत कक्ष, सांगली यांच्याकडे तक्रार केल्याचे दिसून येते.

सदर कक्षाने सदर ग्राहकास यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ मिळणार नसल्याचा निर्णय दिल्याने नाराज होवून मंचामध्ये अर्ज दि. २.३.२०१० रोजी दाखल केला.

मंचाने सदरचा अर्ज दाखल करुन घेवून पुढील कार्यवाहीचा भाग म्हणून वि.प.कडून मुद्देनिहाय अभिप्राय व कागदपत्रे मागविली. सदर म्हणणे दाखल करतांना तक्रार दाखल करुन घेण्यास योग्य नाही, ग्राहक स्वच्छ हाताने मंचापुढे आला नाही, ग्राहकाचा उद्देश लबाडीचा आहे तसेच योजनेच्या लाभासाठी आवश्यक ती रक्कम जमा नसल्याने ग्राहकाचा अर्ज दाखल करुन घेवू नये असे म्हणणे नोंदले आहे. सदरच्या ग्राहकाने मे. दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठस्तर, विटा यांचे न्यायालयात रे.दि.मु.नं. २२/०७ ने दावा दाखल केला आहे. मंचापुढे प्रतिज्ञापत्र सादर करतांना सदरची मागणीविषयी इतर न्यायालय / लवाद यांच्यापुढे प्रलंबित वा निकाली नाही असे लबाडीने नोंद केले आहे, तथापि तशी वस्तुस्थिती नाही. त्यामुळे सदरचा अर्ज हक्काकरीता मंचासमोर दाद मागण्याचा कोणताही नैतिक व कायदेशीर अधिकार नाही. म्हणून सदरचा अर्ज फेटाळणेस पात्र आहे असे प्रतिपादन केले.

सबब ग्राहकाने अर्जासोबत जोडलेले कागदपत्रे तपासली तसा दावा दाखल होता हि वस्तुस्थिती आहे. तथापि सदरील अर्जावर मा. न्यायाधिश यांचा कोणताही आदेश झाला नाही. ग्राहकाने स्वत:हून सदरचा अर्ज / दावा काढून घेतला आहे. त्यामुळे वि.प.चे म्हणणे ग्राह्य धरता येत नाही. तसेच तरतुदीनुसार अस्तित्वात असलेल्या अंतर्गत कक्ष, सांगली यांनी याकामी निर्णय दिलेला आहे. त्याबद्दल ग्राहकाने मंचापुढे अपिल अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुतचा मुद्दा अंतर्गत कक्षपुढे वि.प.तर्फे मांडला जाणे स्तुत्य होते, तसे झाले नाही. त्यामुळे After thought ( सबब विचारानंतर ) असे वर्तन वि.प.चे वाटते. त्यामुळे प्रथमत: सर्व मुद्दे नोंदविले आहेत. मंचाने रितसर सुनावणी दि. ५.५.२०१० रोजी घेतली. ग्राहक गैरहजर. प्रतिनिधी श्री. जावेद मोमीन उपस्थित. वि.प.तर्फे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

सदर च्या यंत्रमाग संजीवनी योजनेकरीता मार्च २००४ ची बाकी पैंकी ५०% रक्कम मार्च २००५ पूर्वी भरणेचे आहे व त्याचबरोबर एप्रिल २००४ ते मार्च २००५ च्या कालावधीमधील चालू बिल रक्कमही त्यासोबत भरणे आवश्यक होते. याचाच अर्थ मार्च २००५ नंतर कोणतीही थकबाकी ग्राहकाची असता कामा नये . यासाठी एप्रिल २००० ची बाकी निश्चित करुन मे २००० ते मार्च २००४ पर्यंतचा हिशोब शासनाने जाहीर केल्याप्रमाणे नव्याने मांडून ग्राहकास मार्च २००४ ची ५०% भरावयाची रक्कम कळविण्याची जबाबदारी वि.प.ची होती. वीज नियामक आयोगाने वेळोवेळी ठरवलेले दर व शासनाने व्यवसायाच्या मदतीसाठी जाहीर केलेले दर यात तफावत होती. आयोगाच्या दरपत्रकाप्रमाणे वि.प.ने बिले अदा केली होती. तसा सी.पी.एल. हिशोब नोंदविला आहे. तथापि फरकाची रक्कम शासन देणार असल्याने मार्च २००५ अखेर कोणतीही बाकी शिल्लक न राहण्याच्या अटीवर सदरची योजना जाहीर झालेली होती. वि.प.ने वेळीच शासनाच्या धोरणाप्रमाणे हिशोब करुन ५०% भरावयाची रक्कम कळविणे आवश्यक होते, तसे एप्रिल २००४ ते मार्च २००५ च्या बिलात नोंदविणे हे सक्तीचे होते सदरील ५०% रक्कमही १५%+१५%+२०% अशी भरावयाची असल्याने वि.प.कडून तशी निश्चित आकडेवारी ग्राहकास कळविणे आवश्यक होते. तसेच कृत्य न झाल्याने सदर ग्राहकास सदर योजनेचा लाभ देणे उचित आहे असे मंचाचे मत झाले आहे. तसेच सदर मार्च २००४ च्या थकबाकीवरील सर्व दंड व व्याज रद्द करावे असे मंचाचे मत आहे तसा मंच आदेश पारीत करीत आहे.

श्री. बाळा तुकाराम बिसूरकर, मु.पो. विटा ग्राहक क्र. २७६२५०००५५४२ हे पॉवरलूमसाठी वीज जोडणीचा वापर करतात. सदर ग्राहकाने सादर केलेली बिल पावत्या तसेच सी.पी.एल. वरील नोंदी याचा अभ्यास करता, पैंसे भरण्याचा मानसिकता दिसून येते. ग्राहकाच्या सी.पी.एल. वरील नोंदीप्रमाणे मार्च २००४ अखेर रु. २,२९,४३९.०१ इतकी बाकी दिसून येते. वि.प.ने नव्याने दाखल केलेल्या सहाय्यक लेखापालाच्या स्टेटमेंटप्रमाणे मार्च २००४ अखेर रु. १,११,४००.४१ इतकी थकबाकी दिसून येते. दोन्ही रकमा तपासल्या, त्यात भिन्नता दिसून येते. याचाच अर्थ ग्राहकास योग्य ती बिले वि.प.कडून वेळच्यावेळी मिळालेली नाहीत. त्यामुळे सर्व बाजूंनी विचार करुन ग्राहकास यंत्रमाग संजीवनी सवलतीचा लाभ मिळणे योग्य आहे असे मंचाचे मत आहे. त्यामुळे रु. ५५,७००.२१ इतक्या रकमेची सवलत ( लाभ ) ग्राहकास देण्याचे निश्चित करुन उर्वरित रु. ५५७००.२१ अधिक मार्च २००५ पर्यंतची वापराची बिल रु.२६२२५.१० अशी रु. ८१९२५.३१ इतक्या देय रकमेतून वेळोवेळी जमा केलेली ( एप्रिल २००४ ते मार्च २००५ ) रु. ४९,४४९.०० हि वजा करावी म्हणजे रु. ३२४७६.३१ इतकी रक्कम निव्वळ देय म्हणून निश्चित करुन एप्रिल २००५ च्या पुढील हिशोब नव्याने मांडावा. मार्च २००४ च्या येणे रकमेवर दंड व व्याज आकारणी करु नये, कारण वि.प.कडून वेळच्यावेळी योग्य बिले दिलेली नाहीत. त्यामुळे मंच पुढील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१) ग्राहकाची यंत्रमाग संजीवनीचा लाभ विषयाची मागणी मान्य करण्यात येत आहे. त्यामुळे रु.३२४७६.३१ इतकी रक्कम मार्च २००५ अखेरची निश्चित केलेली आहे. ती ग्राहकाने एकरकमी भरणेची आहे.

२) सदर रक्कम मार्च २००५ अखेरची निश्चित समजून त्यापुढील हिशोब वि.प.ने नव्याने मांडून ग्राहकास लेखी कळवावा, समजावून सांगावा.

३) सदर रकमेवर दंड व व्याज लावू नये.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( जी. सी. लेले )
सदस्य

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष :

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष